ISSN 2278-8808
UGC APPROVED SR. NO. 45269
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# पेपर – विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे शिक्षण

**प्रा. डॉ. अमरनाथ शांताराम कुमावत**

*विद्या प्रतिष्ठान (महाराष्ट्र)संचर्लि शिक्षणशास्त्र महाविद्यालय अहमदनगर.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**विशेष गरजा असणाऱ्या बालकांचे शिक्षण – आंतरराष्ट्रीय स्थिती**

१) संयुक्त राष्ट्राच्या सर्वसाधारण सभेने १९८१ हे वर्ष आंतरराष्ट्रीय अपंग वर्ष म्हणून जाहीर केले.

२) संयुक्त राष्ट्रांनी १९८६ ते १९९५ हा कालावधी 'अपंग दशक 'म्हणून घोषित केला. या दशकामध्ये अपंग व्यक्तींना समान संधी देणारे नियम संयुक्त राष्ट्रांनी तयार केले.

३) मार्च १९९० मध्ये 'सर्वांसाठी शिक्षण' यासंबंधी जागतिक परिषद भरविण्यात आली.

४) १९९३ ते २००२ अपंग व्यक्तिंसाठी 'युएन – एस्कॅप' दशक जाहीर झाले. या दशकात जून १९९४ मध्ये स्पेन सरकारने 'सालमानक' येथे युनेस्कोच्या सहकार्याने 'विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी शिक्षण' या विषयावर जागतिक परिषद आयोजित केली.

या परिषदेत, ज्या बालकांमध्ये गंभीर स्वरुपाचे शारीरिक अपंगत्व आहे अशा सर्व बालकांना उत्तम प्रकारे शिक्षण कसे देता येईल यासाठी मार्ग शोधण्याची जबाबदारी सर्व शाळा व शाळांही संबंधित यंत्रणेवर टाकण्यात आली.

**राष्ट्रीय स्थिती**

१) १९४७ मध्ये शिक्षण मंत्रालयाने विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी एक विशेष पथक स्थापन करुन त्यांच्या शिक्षणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले.

२) एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकापासून स्वयंसेवी संघटनांनी या क्षेत्रात जो अनुभव प्राप्त केला होता त्या आधारावर शिक्षण मंत्रालयाने उपाययोजना करण्यासाठी विचारविनिमय केला.

३) शिक्षण मंत्रालय भारत सरकारने १८८३ मध्ये मुंबई येथे बधिरांसाठी पहिली शाळा स्थापन केली.

४) अंधांसाठी पहिली शाळा १८८७ मध्ये अमृतसर येथे स्थापन करण्यात आली.

५) १९ व्या शतकाच्या अखेरीपूर्वी अंध व बधिरांसाठी विशेष शाळा मोठ्या संख्येने स्थापन करण्यात आल्या.

**अपंगांसाठी धोरणे व कायदे** NPE - 1986

**राष्टीय शैक्षणिक धोरणे**

राष्ट्रीय शैक्षणिक, धोरणात एकात्मिक शिक्षणाला अग्रक्रम देण्यात आला. या धोरणामध्ये समानतेचा मुद्दा केंद्रस्थानी मानला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या कलम ४ .९ मध्ये अपंग मुलांच्या गरजांवर स्पष्टपणे लक्ष केंद्रित करण्यात आले.

''शारीरिक व मानसिकदृष्ट्या अपंग असणाऱ्यांना समाजातील एक घटक म्हणून एकत्र आणणे, त्यांची वाढ सामान्य पद्धतीने करणे आणि धैर्य व आत्मविश्वासाने जीवनास तोंड देण्यासाठी समर्थ करणे हे उद्दिष्ट असायला हवे.''

असे या धोरणात नमूद करण्यात आले आहे.

या उद्दिष्टांनुसार पुढील उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या.

१) जेव्हा शक्य असेल तेव्हा स्नायूतील अपंगत्व व इतर किरकोळ अपंगत्व असणाऱ्या चालकांना इतर सर्वसामान्य बालकांसारखे समान शिक्षण मिळावे.

२) मोठ्या प्रमाणात अपंगत्व असणाऱ्या बालकांसाठी शक्य असेल तेथवर जिल्हा मुख्यालयांच्या ठिकाणी वसतिगृहासह विशेष शाळांची तरतूद करण्यात येईल.

३) अपंगांसाठी व्यवसाय प्रशिक्षण देण्यासाठी पुरेशी व्यवस्था करण्यात येईल.

४) अपंग बालकांच्या विशेष अडचणींची सोडवणूक करण्यासाठी शिक्षकांनी, विशेषत्वाने प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्याच्या कार्यक्रमांची पुरर्रचना करावी.

५) अपंग शिक्षणासाठी स्वेच्छेने प्रयत्न करणाऱ्यांना शक्य तेवढे प्रोत्साहन देण्यात येईल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ ची पार्श्वभूमी विचारात घेता 'आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रयत्नांचा स्वीकार' हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. रॉयल कॉमनवेल्थ सोसायटी फॉल ब्लाईड आणि क्रिस्टोपल ब्लाईड मिशन या दोन आंतरराष्ट्रीय संस्थांनी अंध बालकांसाठीच्या शिक्षणाच्या संदर्भात एकत्रित प्रयोग सुरु केले. १९७० च्या सुमारास सर्वसामान्य शाळांमध्ये अपंग मुलांचा समावेश करण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयोगाला यश आले. या प्रेरणेने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील एकात्मिक शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट झाले.

**कृती योजना** POA - 1992

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ नंतर कृती योजना POA – 1992 तयार करण्यात आली. या कृती योजनेमध्ये विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यासाठी व्यावहारिक तोडग्याचा अंगिकार करण्याचे सुचविले होते. सामान्य शाळेत शिक्षण घेऊ शकणाऱ्या अपंग बालकांना इतर बालकांबरोबर सामान्य शाळेतच शिक्षण दिले पाहिजे. त्या बालकांना विशेष शाळेत शिक्षण देण्यात येऊ नये हे तत्व स्विकारण्यात आले. ज्या

मुलांना अभ्यासक्रमातील विशेष कौशल्य संपादन करण्यासाठी प्रारंभी विशेष शाळेत प्रवेश दिला असेल त्यांनाही दैनंदिन जीवन जगण्याचे शिक्षण, संवाद कौशल्य व मुलभूत शैक्षणिक क्षमता संपादर करण्यासाठी सामान्य शाळेतच पाठविण्यात यावे.

**कृती योजना** POA - 1992 **ची उद्दीष्ट्ये**

कृती योजना उद्दिष्टे

१) दैनंदिन जीवन जगण्याचे शिक्षण देणे
२) संवाद कौशल्य विकसित करणे
३) मुलभूत शैक्षणिक क्षमता विकसित करणे
४) अभ्यासक्रमातील विशेष कौशल्य संपादन करण्यासाठी तयार करणे.
५) सामान्य बालकांप्रमाणे व्यवहार करण्यासाठी सक्षम बनविणे.

विशेष बालकांना कृति योजनेंतर्गत शिक्षणासाठी नवसंजीवनी प्राप्त झाल्याचे दिसून येते. म्हणून विशेष शिक्षणात कृती योजना १९९२ चे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

अपंग व्यक्ती अधिनियम PWD – 1992

Person with Disability Act - 1995

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ हा भारतातील विशेष शिक्षणाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण व उपयुक्त असा कायदा आहे. या कायद्यात प्रामुख्याने चार बाबी अंतर्भूत आहेत. परंतु या चारही बाबींची व्याप्ती फार मोठी आहे.

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्क, संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ या कायद्याच्या शीर्षकातच या चारही महत्त्वपूर्ण बाबींचा उल्लेख केलेला असल्याने या कायद्याचे स्वरुप फारच व्यापक आहे. या अधिनियमात अपंगांच्या सर्व प्रकारांचा समावेश केलेला आहे. कोणताही घटक आपल्या संधी व हक्कांपासून वंचित राहू नये यांचा परिपूर्ण विचार या कायद्यात केलेला आहे. अपंगांच्या संरक्षणविषयक तरतुदींचा समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय कार्यात अपंगांचा संपूर्ण सहभाग अपेक्षित आहे.

**अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मध्ये अंतर्भूत बाबी**

अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ अपंगत्वाच्या प्रकारांचा विचार

१) अंधत्व
२) अंधदृष्टी
३) श्रवणदोष
४) चलनवलन दोष (अस्थिव्यंग)
५) मतिमंदत्व
६) कुष्ठरोग मुक्ती
७) मनोविकार

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्क, संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ या अधिनियमाचे प्रकरण पाचमधील कलम २७ या शिक्षणाशी संबंधित भागामध्ये संबंधित राज्य आणि स्थानिक प्राधिकरणाने करावयाच्या बाबी पुढीलप्रमाणे

१) अपंग असलेल्या प्रत्येक बालकाला १८ वर्षे वयापर्यंत योग्य वातावरणात मोफत शिक्षणासाठी प्रवेश मिळेल याबाबत खात्री करुन घेणे.

२) अपंग बालकांना सामान्य शाळांमधिल विद्यार्थ्यांमध्ये सामावून घेण्यास प्रोत्साहन देणे.

३) विशेष शिक्षणाची गरज असणाऱ्यांसाठी सरकारी व खाजगी क्षेत्रात विशेष शाळा उभारण्यास प्रोत्साहन देणे व त्या शाळा देशातील कोणत्याही भागात राहणाऱ्या अपंग बालकांना प्रवेशासाठी खुल्या असणे.

४) अपंग बालकांसाठी असलेल्या विशेष शाळांना व्यावसायिक प्रशिक्षणाच्या सुविधा सुसज्ज करण्याचा प्रयत्न करणे.

**भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम १९९२ RCI – Rehabilitation Council of India**

भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम १९९२ द्वारे कृती योजनेला (POA – 1992) अधिक बळकट करण्यात आले. अपंग शिक्षणात योगदान देणारे देशातील विशेष शिक्षक व इतर पुनर्वसन व्यवसायी यांच्या प्रशिक्षणाचे प्रमाणीकरण आणि गुणवत्ता निश्चित करण्यसााठी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नसल्याचे पूर्विच्या अनुभवांवरुन दिसून आले होते. म्हणून अपंग व्यक्तिंच्या विशेष शिक्षण व पुनर्वसनाच्या क्षेत्रामध्ये आवश्यक असलेल्या सोळा व्यावसायिक संवर्गामधील प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे मूल्यमापन व प्रमाणीकरण करण्यासाठी संविधानिक यंत्रणा १९९२ मध्ये स्थापन करण्यात आली. ही यंत्रणा म्हणजेच भारतीय पुनर्वसन परिषद होय. भारताच्या संसदेत सन १९९२ मध्ये भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम पारित करण्यात आला. भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियमात सन २००० मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार सामान्य शाळांमधञल विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी पूरक सेवा देऊ शकतील अशा विशेष शिक्षकांना तसेच साधन शिक्षकांना (Resource Teachers) प्रशिक्षण देण्याची जबाबदारी भारतीय पुनर्वसन परिषदेकडे सोपविण्यात आलेली आहे.

‘भारतीय पुनर्वसन परिषद’ या कायद्यान्वये अपंग व्यक्ति म्हणजे ‘डोळ्यांनी अंध, कानाने बहिरा– कर्णदोष, दोन्ही कानांनी अजिबात ऐकू न येणे किंवा ऐकण्याची क्षमता ७० डिसीबलपर्यंत असणे, हात किंवा पायातील दोष, हाडे, सांधे आणि स्नायू यांच्या मुक्त हालचालींवर मर्यादा आल्यामुळे निर्माण झालेले अस्थिव्यंग आणि मतिमंद होय’ अशी संपल्पना मांडलेली आहे. या अपंग संकल्पनेच्या चौकटीत राहून ही परिषद आपले कार्य करीत असते.

भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम १९९२ म्हणजे अपंग व्यक्तिंना नवनवीन संधी उपलब्ध करुन देणारे दालन होय. या अधिनियमातील बाबींची अंमलबजावणी काटेकोरपणे झाली तर अपंगांना व त्यासबंधी निगडित असणाऱ्या सर्व घटकांना शिक्षण मिळण्यासंबंधी मोठी संधी उपलब्ध होईल. विशेष बालकांना दर्जेदार शिक्षण मिळेलच त्याबरोबर त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी शासनाकडे असल्याने त्यांना जीवन जगण्यात सुकरता निर्माण झाली आहे. विशेष बालकांना या अधिनियमाद्वारे शिक्षणाची संधी प्राप्त झाल्याने त्यांच्या जीवनाला नवी दिशा, नवा आयाम मिळालेला आहे. आपली मुले अपंग आहेत या न्यूनगंडाने पालकही  या पुनर्वसन अधिनियमाद्वारे स्वाभिमानाने जीवन जगू शकतील. शासनाने अशा पालकांना मोठा दिलासा दिलेला आहे.

**संदर्भसूची –**

*समावेशक शिक्षण – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांची शिक्षकांसाठी हस्तपुस्तीका*
*डॉ. शेवतेकर – व डॉ. निकुमे – विशेष मुलांचे विशेष शिक्षण.*